# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८.

क्र.परीक्षा/परीक्षा अर्ज/निकाल कक्ष/३२६/२०२१, दि. २३ सप्टेंबर, २०२१.

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयाचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम–२०१६** च्या तरतुदीनुसार विद्यापीठाने परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता परीक्षांच्या पध्दतीमध्ये काही अमुलाग्र बदल करण्याचे ठरविले आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता विद्यापीठाच्या या धोरणास सकारात्मक प्रतिसाद देणे अपेक्षित असून विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची विद्यार्थी व महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त धोरणानुसार शैक्षणिक वर्षे २०२१–२२ मधील **<u>हिवाळी–२०२१ (द्वितीय सत्र)–२०२१</u>** मध्ये होणाऱ्या **<u>4L00115 L.L.B/Gen L.L.B(Sem-V)(60:40)(CBCS)(R-2019)(3years Course)</u>** परीक्षेचे परीक्षा प्रवेश अर्ज विहीत फीसह **M.K.C.L.** या अभिकरणामार्फत Digital University Portal (**<u>mum.digitaluniversity.ac</u>**) वरून Online घेण्यात येणार आहेत.

सर्व विधी महाविद्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश प्रक्रिया (Admission Proccese) M.K.C.L च्या पोर्टलवर पुर्ण करव्यात तद्नंतरच तृतीय वर्षाचे परीक्षा प्रवेश अर्ज त्यांच्या महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतील याची संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

सदर नमूद केलेल्या अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज Digital University Portal (mum.digitaluniversity.ac) वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालील प्रमाणे आहे:–

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | महाविद्यालयाने Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारीख | विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १ | नियमित शुल्क | २८/०९/२०२१ ते ०८/१०/२०२१ | १२/१०/२०२१ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत) |

वरील नमूद केलेल्या तारखांच्या तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम/सत्र निहाय परीक्षा प्रवेश अर्ज परीक्षा अर्ज भरून घेण्यापासून ते परीक्षा शुल्क भरण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया Digital University Portal (mum.digitaluniversity.ac) वर पूर्ण करून त्यांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तपशीलाची प्रत <u>(Exam Form Submission Report)</u> व परीक्षा शुल्क भरल्याची पावती परीक्षा विभागात वरील तारखांप्रमाणे हस्तेपोच जमा करण्यात यावी. **पोस्टाने अथवा कुरीअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही.**

**परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजता (०८/१०/२०२१ रोजी) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.**

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत), माध्यम, परीक्षा केंद्र, विषय व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत, याची खात्री करून घ्यावी. सदर माहिती गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र यासाठी वापरण्यात येणार आहे. **परीक्षा अर्ज Inward झाल्यावर वरील कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांच्या Login मधून परीक्षेचे विषय बदल करता येतील. परीक्षा अर्ज Inward झाल्यानंतर परीक्षेच्या विषयामध्ये बदल करावयाचा असल्यास प्रती विषय [illegible] प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

UG परीक्षेच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रथम सत्राचे परीक्षा प्रवेश फी हि त्या परीक्षेच्या प्रवेश(Admission) शुल्कासोबत घेण्यात आलेली असल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज महाविद्यालयांना Inward करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये Fresher विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज Inward करण्यासाठी उपलब्ध राहणार नाहीत.

प्रवेश(Admission) शुल्कासोबत परीक्षा प्रवेश फी घेतलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज या परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या अंतिम दिनांकास Automatic Inward होत असल्यामुळे महाविद्यालयांनी या परिपत्रकाच्या अंतिम दिनांकापर्यंत विद्यार्थ्यांच्या विषयामध्ये काही बदल करावयाचे असतील तर ते करावे नंतर बदल करता येणार नाही.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात प्रशासनातील वरीष्ठांकडे विनंती करून त्यांचा अमुल्य वेळ वाया घालवू नये ही विनंती.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई.
दि. : २३/०९/२०२१.

प्रति,

विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयाचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव

अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई— ४०० ०९८.
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.
३. उपकुलसचिव(नावनोंदणी विभाग), डॉ. आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई—०९८.
४. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई—०९८.
५. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई— ४०० ०९८.
६. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.
७. सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई— ४०० ०९८.
८. समन्वयक, M.K.C.L. परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०३२.
२. उपकुलसचिव(जनसंपर्क), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०९८.
३. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई— ४०० ०३२.
४. प्र. कुलगुरू/कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी/संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ